**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

**Impact Factor – 7.139** **ISSN – 2319-8648**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Special Issue on**
## Contemporay Problem and Role of Philosophers
Philosophy of Dr. Amartya Sen & Philosophy of Modern Saint Vai. Sonopanth Dandekar

**Oct. 2021**

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Executive Editor**
**Dr. Kiran Save**

**Co-Editors**
**Dr. Tanaji Pol**
**Asst. Prof. Anagha Padhye**

**Shaurya Publication , Latur**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# Index


| Sr.No. | Ttile of the paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Murray Bookchin's Social Ecology: An Alternative Solution to Ecological Crisis | Dr. Amita Valmiki | 01 |
| 2. | Living the Constitution in a religio-fanatic society; Mahatma Gandhi on democracy and constitution | Dr. Tabassum Sheikh | 05 |
| 3. | A Critical Study of Mahatma Gandhiji as an Iconic Philosopher of the World | Dr. Surendra S. Khandekar | 09 |
| 4. | Justice Theory of Amartya Sen with Reference to the Capability Approach | Dr.Tanaji Pol | 15 |
| 5. | Amartya Sen Philosophy: Key Points on Contributions of Economics | Dr. Yogesh M. Kulkarni | 19 |
| 6. | Philosophical Problem of intolerance with reference to Amartya Sen, Buddha and J. Krishnamurti | Mr. Jivitesh Patil | 25 |
| 7. | वै. सोनोपंत दांडेकर यांच्या विचारविश्वाचा मागोवा–'ज्ञानदेव व प्लेटो' या ग्रंथाच्या अनुषंगाने | डॉ. मीनल कातरणीकर | 28 |
| 8. | तत्त्वज्ञानाचे उपयोजन व उपयोजित तत्त्वज्ञान | डॉ. शर्मिला वीरकर | 34 |
| 9. | तत्त्वज्ञान की अध्यात्मशास्त्र : कै. सोनोपंत दांडेकर | डॉ. हिरीश नवले | 38 |
| 10. | स्त्रियांच्या सबलीकरणाबाबतीत अमर्त्य सेनची भूमिका | डॉ. संगीता पांडे | 47 |
| 11. | तार्किक प्रत्यक्षार्थवादी विचारवंत आणि प्रचितिक्षमतेचे तत्त्व | डॉ. किरण सावे | 51 |
| 12. | लौकिक जीवनातील समस्यांचे तत्त्वज्ञान करणारा तत्त्वज्ञ: संत गाडगे बाबा | डॉ. राजेसाहेब मारडकर | 57 |
| 13. | आधुनिक संत वैकुंठवासी सोनोपंत दांडेकर यांचे तत्त्वज्ञान : व्यक्ती आणि विचार | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | 64 |
| 14. | मॅक्स वेबर यांची सामाजिक दर्जानुसार वर्गपद्धती / गटपद्धती | डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 69 |
| 15. | बुद्धांच्या अव्याकृत प्रश्नांची तात्त्विक सिद्धता | प्रा. डॉ. अमन बगाडे | 74 |
| 16. | अमर्त्य सेन यांची आर्थिक व तात्त्विक भूमिका | प्रा. डॉ. सचिन खोकले | 77 |
| 17. | पर्यावरणीय समस्या आणि तत्त्ववेत्यांची भूमिका | डॉ. वेदप्रकाश डोणगावकर | 81 |
| 18. | वारकरी संतांचा पर्यावरणाबद्दलचा विचारः एक विवेचन | डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर | 85 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# अमर्त्य सेन यांची आर्थिक व तात्त्विक भूमिका

**प्रा. डॉ. सचिन खोकले**
**तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, श्री संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड, जि.परभणी**

---

भारतरत्न अमर्त्य सेन हे जागतिक कीर्तीचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराचे मानकरी आहेत. सेन यांचा जन्म शांतिनिकेतन येथे एका सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबात आशुतोष व अमिता या दांपत्यापोटी झाला. वडील आशुतोष हे ढाका विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. सेन यांनी ढाका येथील सेंट ग्रेगरी स्कूलमध्ये सुरुवातीचे शिक्षण घेऊन पुढे विश्वभारतीत इंटरपर्यंतचे शिक्षण घेतले. १९५३ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून अर्थशास्त्र हा विषय घेऊन ते बी. ए. झाले. नंतर ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९५५ मध्ये ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिजमधून त्यांनी दुसऱ्यांदा अर्थशास्त्र विषयात बी. ए. ही पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी तेथूनच १९५९ मध्ये एम. ए. आणि पीएच. डी. या पदव्या संपादित केल्या. पुढे १९५८–१९६३ या काळात ते ट्रिनिटी कॉलेजमध्ये अधिछात्र होते. १९६३–१९७१ या काळात दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अध्यापन केले. नंतर १९७१–७७ या काळात त्यांनी इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि १९७७–१९८८ या काळात ऑक्सफर्ड विद्यापीठ येथे अध्यापन केले. अर्थशास्त्राबरोबरच त्यांनी तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास केला. त्यांनी १९८८–१९९८ या काळात अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचे अध्यापन केले. त्यांची १९९८–२००४ या काळापर्यंत 'मास्टर ऑफ ट्रिनिटी कॉलेज' या पदावर नियुक्ती झाली. या पदावर काम करणारे ते पहिले भारतीय होत. त्यानंतर हार्वर्ड येथे लॅमॉंट युनिव्हर्सिटीत प्रोफेसर म्हणून त्यांनी काम केले. अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. त्यांनी अर्थशास्त्रावर जवळपास २१५ शोधनिबंध लिहिले आहेत. त्यांनी अर्थशास्त्राशी निगडित शोधांवर २४ पुस्तके लिहिली. ही सर्व पुस्तके विश्वभरात प्रसिद्ध आहेत.

**अमर्त्य सेन यांची आर्थिक भूमिका**

अमर्त्य सेन यांची मांडणी मुख्यरूपाने मनुष्यबळातील गुंतवणुकीमध्ये– म्हणजे कल्याणकारी योजनांच्या बाजूने आहे. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील मूलभूत समस्यांवरील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. (१) सामाजिक निवडीचा सिद्धांत, (२) दारिद्र्याचे निर्देशांक, (३) कल्याणाचे निर्देशांक आणि (४) दुष्काळाचे विश्लेषण. इ.बाबत सेन यांचे चिंतन महत्त्वाचे आहे. उदारीकरण पर्वातील आर्थिक सुधारणा आणि कल्याणकारी योजना यांची यादी करायची ठरली तर ती बरीच मोठी होईल, पण अगदी ठळक व सर्वसामान्य लोकांना माहीत आहेत अशा योजनांवर व सुधारणांवर केवळ नजर टाकली आणि त्यांची उद्दिष्टे व हेतू लक्षात घेतलेतरी हे स्पष्ट होईल. अगदी अलीकडची उदाहरणे द्यायची तर 'एफडीआय' (किरकोळ क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला परवानगी), पेट्रोल–डिझेल नियंत्रणमुक्त करणे, गॅस सिलेंडरवरील सबसिडी कमी करणे इत्यादी आर्थिक सुधारणा, तर कल्याणकारी योजनांमध्ये– सर्वशिक्षा अभियान, रोजगार हमी योजना, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि अन्नसुरक्षा कायदा इ.चा समावेश करता येतो.

सेन यांनी समाजातील दारिद्र्याचे व कल्याणाचे निर्देशांक निश्चित केले. हे निर्देशांक पुढील दोन कारणांसाठी महत्त्वाचे ठरतात. देशातल्या वेगवेगळया समाजगटांत दारिद्र्याचे प्रमाण किती आहे त्यांत वेळोवेळी कसे आणि कोणते बदल झाले आहेत, याचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे देशातले दारिद्र्याचे प्रमाण आणि आर्थिक कल्याणाचे प्रमाण ह्यांच्या तुलनेसाठीही हे निर्देशांक महत्त्वाचे ठरतात. त्यांनी देशांची क्रमवारी ठरविण्यासाठी तेथील लोकांचे आयुर्मान, शिक्षण व उत्पन्न यांवर आधारित 'युनायटेड नेशन्स ह्यूमन इंडेक्स' ही प्रणाली विकसित केली. दुष्काळ हा केवळ अन्नधान्याच्या तुटवड्यामुळेच होत नसून अन्नवाटपाच्या यंत्रणांमधील विषमतेमुळेही तो होऊ शकतो, असे प्रतिपादन त्यांनी केले. अर्थवेत्ते ॲडम स्मिथ यांची 'अदृश्य हात', तर जोसेफ शुम्पिटर यांची 'सर्जनशील विनाश' या सद्याा हीच त्यांची ओळख झाली.

तसाच अमर्त्य सेन यांच्या 'दुष्काळासंबंधी' भाष्यामुळे इतिहास घडला गेला. तसे पाहता सेन यांचा दुष्काळविषयक सिद्धांत साधा व सरळ आहे, ''अन्नधान्याची उपलब्धता नसल्यामुळे भूकबळी जात नाहीत, तर कित्येक वेळा धान्य उपलब्ध असूनही ते विकत घेणे हेच गरिबांना परवडत नाही. ते धान्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत'' हा त्यांचा सिद्धान्त होता. आपल्या अभ्यासातून त्यांनी 'गरिबांना धान्य विकत घेणे परवडेल, याची सोय करा' हा संदेश दिला आहे. संयुक्त राष्ट्रसंघापासून ते अनेक देशांच्या धोरणांवर त्याचा प्रभाव जाणवतो. शहरांमधून निर्माण झालेली आर्थिक तेजी आणि त्यामुळे वाढलेल्या अन्नधान्याच्या किमती यांमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे शक्य असते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी दुष्काळ प्रत्यक्ष पाहिला होता. त्यात उपासमारीने लाखो लोक मरण पावले होते. वाढलेल्या किमतीत धान्य घेणे ज्यांना शक्य नव्हते, अशी माणसे उदा. भूमिहीन मजूर– मृत्युमुखी पडली. माहितीच्या आधारे सेन यांनी असे दाखवून दिले होते की, बंगालमध्ये त्यावेळी धान्यसाठा पुरेसा होता तथापि साठेबाजीमुळे धान्य महाग झाले. परिणामत: सामान्य लोकांना ते खरेदी करणे अशक्यप्राय झाले. त्यामुळे लोकांची उपासमार झाली. आणि परिणमी लाखो लोक मरण पावले.

जगाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टींचा अमर्त्य सेन यांनी अभ्यास केला. याच्या आधारे त्यांनी एक निष्कर्ष काढला होता की, ज्यांचे जीवन हे दु:ख आणि दारिद्र्याने भरलेले आहे असे लोक भारतात अधिक आहेत. इतिहासदेखील सांगतो आहे की, बाहेरून आलेले परकीय राज्यकर्ते आणि व्यापाऱ्यांनी या देशातील सामान्य माणसाची कंबर मोडली आहे. आर्थिक संकट हे त्यांच्या खांद्यावर बोजा बनून आहे. हा बोजा ओढत ओढत कोणाला माहीत किती पिढ्या गेल्या आहेत आणि पुढे येणाऱ्या किती पिढ्या याच्याखाली दबून खचतील. अमर्त्य सेन यांच्यामते, जगात गरिबीचे कारण हे शिक्षणाची आणि साधनसंपत्तीची कमतरता हेच आहे. पैसे कसे कमावता येतील, याचे ज्ञानदेखील आपल्याला शिक्षणातून होते. शिक्षणाने अज्ञानरुपी अंधार नष्ट करता येतो. शिकलेली व्यक्ती ही अंधविश्वास न ठेवता धर्माच्या नावावर रस्ता भटकत नाही. शुद्ध आचरण आणि शुद्ध व्यवहार करणाऱ्या व्यक्ती ह्या स्वत:ला अज्ञानाच्या धोक्यापासून वाचवू शकतात. असे लोक आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी नवीन नवीन मार्ग शोधत असतात. याआधारे सरकारने शिक्षण हे सक्तीचे करायला हवे, जेणेकरून समाज हा शिक्षित बनेल आणि देश विकसित होईल.

**अमर्त्य सेन यांची तात्विक भूमिका**

''तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अशा बहुविध अंगांनी अर्थशास्त्राचा अन्वयार्थ लावणारे अमर्त्य सेन यांच्यासारखे तत्त्वज्ञ व भाष्यकार अतिशय दुर्मीळ असतात'', असे जोसेफ स्टिगलिट्झ म्हणतात. सेन हे राजकीय स्वातंत्र्याचे कट्टर समर्थक आहेत. त्यांची अशी धारणा आहे की, आर्थिक वृद्धी प्राप्त करून घेण्यासाठी आर्थिक सुधारणांपूर्वी शिक्षण, सार्वजनिक आरोग्य यांसारख्या क्षेत्रांत मूलभूत सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. त्यांच्या 'द आर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन' या ग्रंथात भारतीय संस्कृती, भारताची ओळख आणि इतिहास या विषयांशी निगडित असे अनेक मार्मिक लेख समाविष्ट केलेले आहेत. सेन यांचा 'दी आयडिया ऑफ जस्टिस' हा ग्रंथ २००९ मध्ये प्रसिद्ध झाला. यात त्यांनी 'द थेअरी ऑफ जस्टिस' (१९७१) जॉन रॉल्स यांच्या गाजलेल्या पुस्तकाच्या अनुषंगाने काही विचार मांडले आहेत. रॉल्सच्या अनेक विचारांना सेन पुष्टी देतात तर काही खोडून काढतात. सेन यांच्यामते आदर्श न्याय्य समाजाची कल्पनाच मुळात सर्वमान्य होणं कठीण असते. आदर्श न्याय्य समाजाची मांडणी करण्यात वेळ घालवण्यापेक्षा समाजात जे जे अन्याय्य आहे आणि ते सर्वमान्य आहे ते दूर करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. उदाहरणार्थ कुपोषण, आरोग्य–सेवा , स्वस्त–प्राथमिक–शिक्षण या विषयांवर सहसा सगळयांचे एकमत होईल. मग याबाबतीत जिथे जिथे अन्याय आहे तो दूर केला पाहिजे. या मार्गाने आदर्श न्याय्य समाजाकडे लवकर पोहोचता येईल. नवीन गढी बांधण्याच्या स्वप्नांत रमण्यापेक्षा आहे ती झोपडी डागडुजी करून कशी सावरता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. समाजातील ही अन्यायाची भावनाच पुढे टप्पा–टप्पाने अस्मिता, संघर्ष आणि हिंसेला कारणीभूत होते. ही अन्यायाची भावना दूर करण्यासाठी राजकीय बहुविविधता आणि सतत प्रश्नांवर चर्चा हे महत्त्वाचे आहे.

'द आर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन' (२००५) ह्या ग्रंथात सेन यांनी ''वादसंवादाच्या परंपरांमुळे भारतीय उपखंडातील सामाजिक व सांस्कृतिक जगाची जडणघडण होत गेली. त्यामुळेच बहुविधता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. भारतीय लोकशाही ही ब्रिटिशांच्या प्रभावाची निष्पत्ती असल्याची ग्वाही अनेक स्वयंघोषित बुद्धिवादी देतात. अतिप्राचीन काळापासून चालत आलेल्या वादसंवाद परंपरांमुळे आपल्या लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत, हा इतिहास त्यांना माहीत नसतो. नाही तर ब्रिटिश साम्राज्याच्या आधिपत्यापासून मुक्त झालेल्या शंभर राष्ट्रांमध्ये लोकशाही सारखीच दिसली असती,'' असा बिनतोड युक्तिवाद त्यांनी केला आहे. 'वाद–संवादांतून चातुर्य येते' या सुभाषिताची प्रचिती भारतीय इतिहासात वारंवार येते.

सध्याचे जग हे महाभयंकर हिंसा आणि पर्यावरणविनाश यांमुळे अंधारून गेले आहे. तर्क वा युक्तीने संवाद साधता येण्याची क्षमता नसणारे निर्बुद्ध लोक बळाच्या आधारे मत लादू पाहतात. असे लोक सर्व काळात, सर्व धर्मांत व पंथांत असतात. लोकशाही व समाजस्वास्थ्य धोक्यात येण्याचे प्रसंग येत असतात. विविध पद्धतींने जनता तिच्या भावना व्यक्त करत आहे आणि हीच आशा आहे. बदल व्हावा ही अभिव्यक्ती महत्त्वाची असते. त्यातूनच युक्तिवाद व वादसंवाद झडू लागतात. मोठ्या परिवर्तनाची ती नांदी असते. काळयाकुट्ट ढगांनी दाटी केली, तरी काही क्षणांत रुपेरी कड अवतरते आणि आसमंत उजळून जातो. निरंतर चालू राहिलेल्या वादसंवाद परंपरेने भारतावरील अनेक सावटे दूर केली आहेत. त्यामुळेच वादसंवाद परंपरा हीच भारतीयत्वाची ओळख आहे, हे सेन यांनी दाखवून दिले आहे.

अमर्त्य सेन यांनी आगदी आरंभापासून अर्थशास्त्रीय सिध्दातांचा मानवी कल्याणासाठी पुरस्कार केला. विद्वानांनी सत्य जगासमोर मांडले पाहिजे. कोणत्याही सत्तेची भीती न बाळगता सत्यचा पुरस्कार केला पाहिजे. या प्राचीन भारतीय परंपरेनुसार वागायचे भान अमर्त्य सेन यांना आह. गेल्या अनेक वर्षापासून डॉ. सेन यांनी बौध्दिक वाद–विवादाची गरज किती महत्त्वाची आहे हे जगासमोर मांडले आहे. बुध्दकाळपासून भारतात सुरू असलेल्या वादाच्या परंपरेचा मानवी विकास प्रक्रियेत किती मोलाचा वाटा आहे, हे डॉ. सेन यांनी आवर्जून सांगितले होते. अर्थात डॉ. सेन यांची भूमिका लोकशाही हिताला प्राधान्य देणारी आहे. भ्रष्टाचार संपविण्यासाठी आपल्याला नैतिक आणि मानवी मूल्यांची जोपासना आणि संवर्धन करणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल, असे सेन यांना वाटते.

अमर्त्य सेन हे नेमक्या कोणत्या विचारांचे आहेत? हा प्रश्न कायमच विचारला जातो. नोबेल मिळेपर्यंत कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य त्यांना भांडवलशाहीचे समर्थक समजत. तर उजवे त्यांना मार्क्सवादी मानत असत. वास्तविक सेन यांना कुठल्याही साचेबद्ध विचारसरणीत टाकता येणार नाही. उदार मानवतावादी विचारांचे ते पाईक आहेत. जात, धर्म, पंथ, भाषा हे भेद त्यांना मान्य नाहीत. गरिबी हा मानवजातीचा शत्रू आहे, ही त्यांची धारणा आहे. युरोप, चीन, अमेरिका वा सिंगापूर, प्रत्येकातील उत्तम ते घ्यावे, हा त्यांचा आग्रह आहे. लोकशाही काळानुरूप प्रगल्भ करावयाची असेल तर संपूर्ण समाजाची प्रगती करावी लागेल. त्यासाठी युद्ध हा अग्रक्रम चालणार नाही. सामाजिक शांतता असेल, तरच सर्व स्तरांना प्रगती करता येईल. विकासामध्ये सर्वांचा समावेश होऊ शकेल, हे त्यांच्या विचारांचे सार आहे. त्यांनी वेळोवेळी कॉंग्रेस व मार्क्सवादी पक्षाच्या सरकारांच्या धोरणांवर टीका केली आहे. डॉ. मनमोहन सिंग हे त्यांचे जवळचे मित्र असूनही ''त्यांच्या कारकिर्दीत प्राथमिक शिक्षणाची उपेक्षा झाली'' असे डॉ. सेन यांनी रोखठोक सांगून टाकले आहे. परंतु श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर अमर्त्य सेन यांच्या टीकेला सकारात्मकतेने घेण्यात आले नाही. उलट, सेन यांच्या मार्गात निर्माण केल्या गेलेल्या अडचणींमुळे त्यांनी नालंदा विद्यापीठात ून अंग काढून घेतले.

समाजाला विचारांचा आणि विवेकाचा आधार देऊ शकणारे विचारवंत अतिशय दुर्मीळ असतात. वाणी आणि लेखणी यांतून वर्तमानाचा अन्वय घेऊन भविष्यासाठी कृती आराखडा देणारे अमर्त्य सेन यांच्यासारखे तत्त्वज्ञ दुर्लभ असतात. महान कलावंत प्रदीर्घ कालखंडभर एखाद्या संकल्पनेचा विस्तार करत जातात; निरनिराळया पद्धतींनी ती समजावून सांगतात. यातून रागमालिका, चित्रमालिका व वास्तु निर्माण होतात. गेल्या

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

अनेक वर्षापासून प्रो. सेन दारिद्रयामागील अनेक कारणांचा सखोल मागोवा घेत नवीन पद्धतीने विश्लेषण करत आहेत. एकाच वेळी तज्ज्ञ व सामान्यांशी संवाद साधताना तशीच मालिका सादर करत आहेत. त्यांच्यामुळे महाकाय व्यवस्थेचे आकलन होते. जटिलता, 'गुंतागुंत, अव्यवस्था ध्यानात येते. प्रश्नांचे स्वरूप आणि उत्तरांची दिशा समजते. हे असामान्य कार्य आहे असे मला वाटते.

**निष्कर्ष**

अमर्त्य सेन यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्रातील विचारांवर बरीचशी टीकाही केली जाते, पण कल्याणकारी योजना राबवल्या नाहीत तर तळातील मनुष्यबळाचा विकास कसा करणार? त्यांना गाळातून वर कसे काढणार? त्यांचे सक्षमीकरण केले नाही तर सुधारणा कार्यक्रम कसे राबविता येणार? सुधारणांचे समर्थक देशाचा 'ग्रोथ रेट' दाखवतात, कल्याणकारी योजनांचे समर्थक 'मानवी विकास निर्देशांक' दाखवतात. सुधारणांचे समर्थक उद्योग–व्यापार, पायाभूत सुविधा या क्षेत्रांतील गुंतवणुकीची गरज दाखवतात, कल्याणकारी योजनांचे समर्थक मनुष्यबळामध्ये तळातल्या समूहांमधील शिक्षण व आरोग्य यांतील गुंतवणुकीबाबत बोलतात. पण हा वाद फार पुरातन आहे. टिळकांना राजकीय सुधारणा प्राधान्याने हव्या होत्या आणि आगरकरांना सामाजिक सुधारणा प्राधान्याने हव्या होत्या. दोन्हींची गती व तपशील याबाबत त्यांचे मतभेद होते. पण अमर्त्य सेन यांना ग्रोथ नकोच असेही नाही, म्हणून अमर्त्य सेन यांचे महत्त्व सध्या अधिक आहे. समाजवादाच्या क्षेत्रात उचललेल्या त्यांच्या ठोस पावलांचे जगभरातील अर्थतज्ज्ञांनी स्वागत केले.

**संदर्भ :**

1. Amartya Sen, The Idea of Justice, Allen Lane & Harvard University Press, 2009.
2. https:// www.wikipedia.org/wiki
3. Dainik loksatta of September 8, 2013 retrive on 19.09.2021